वैध मापन शास्त्र यंत्रणेअंतर्गत सहायक नियंत्रक गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांचे समायोजनेने पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक - बदली-२०१७ /प्र. क्र. ९१/ग्रासं-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ एप्रिल, २०१८

वाचा :- शासन आदेश दिनांक ३१ मे, २०१७ चे बदली आदेश रद्द करण्यात येत आहेत.

शासन आदेश :-

शासन निर्णय क्रमांक- ग्रासंक-२२१०/ प्र.क्र. २६६/ ग्रासं-३ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ अन्वये वैधमापन शास्त्र व ग्राहक संरक्षण यंत्रणेतील संवर्ग एकत्र करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-६ नुसार संबंधित विभाग / यंत्रणेमध्ये जशी जशी पदे रिक्त होतील तसे तसे त्या पदावर अधिकारी / कर्मचारी यांचे समायोजन करावे. अशी तरतुद आहे त्यानुसार श्री. जुमले व श्री. महाजन यांचे समायोजनाने वैधमापन शास्त्र यंत्रणेत खालीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	सध्याच्या पदावर कार्यरत असल्याचे ठिकाण	बदलीचे ठिकाण
१	२	३	४
१	श्री. रा. पु. जुमले	प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अमरावती	सहायक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, नागपूर विभागीय कार्यालय (प्रशा)

२. प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रबंधक यांना नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी कार्यभार घेता यावा म्हणून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांना नवीन नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ रुजु होण्याबाबत कळवावे.

३. उपरोक्त प्रबंधक यांनी नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्वीकारावा, त्यांनी अनधिकृतरित्या गैरहजर राहू नये अन्यथा त्यांची अनुपस्थिती अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल व विनावेतन करण्यात येईल. तसेच त्यांच्या सेवेचा खंड पडण्याची शक्यता देखिल नाकारता येत नाही. याची जाणीव संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

४. नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांना कळविण्यात येते की, संबंधीत अधिका-यांनी पदभार स्वीकारल्याचा दिनांक त्वरीत शासनास कळवावा. विहित कालावधीत संबंधीत अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास, त्याबाबत शासनास त्वरीत अवगत करावे. जेणेकरुन

संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई त्वरीत करणे शक्य होईल. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार बदली झालेल्या अधिका-यांचे रेजेचे अर्ज स्वीकारु नयेत / मंजुर करु नयेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५०९११५०४२९८०६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaskar
Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplier And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbb17268641691acddf048e6aa2150f79b022d09a6c745e92beb9baeed480e62, serialNumber=c8c342ac9a89937bf462ee75f46842ac6d1fbc12a95dda7bfd1d06d7b79b4191, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2018.05.09 11:51:43 +05'30'

(भा. बा. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री. रा. पु. जुमले, प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अमरावती
(प्रबंधक (प्रशासन) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे मार्फत)

प्रत :-

१) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
३) उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र विभागीय कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर.
४) उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, अमरावती
५) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) महालेखापाल -१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / अमरावती
९) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,
१०) निवड नस्ती, कार्यासन ग्रासं-३.